# कोण कोणत्या शाळांमध्ये बोगस शिक्षक भरती घोटाळा वाचा सविस्तर पुढील अंकात...

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564

**आर्थिक देवाण-घेवाणातून शिक्षकांना कायम मान्यता देऊन बेकायदेशीर कामे करून करोडो रुपयांचा केला भ्रष्टाचार?**

**शिक्षण विभागातील भ्रष्टाचार करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई का होत नाही?**

■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष - ०२ ■ अंक - २४३ ■ गुरूवार दि.२२ मे २०२५ ■ आरएनआय - एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 243 ■ Thursday Dt.22 May 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4


# बीड जिल्ह्यात शिक्षक भरतीचे मोठे रॅकेट सक्रिय, संस्था चालकाकडून आर्थिक देवाण-घेवाण करून शिक्षक भरती?

## नागपूर जिल्ह्यापेक्षाही मोठा खाजगी शिक्षक भरती घोटाळा बीड जिल्ह्यात; जिल्हा प्रशासन एवढा मेहरबान का? बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जीवने हे शिक्षक भरती घोटाळा उघडकीस आणणार का दाबणार?

**बीड जिल्ह्यातील अनेक शिक्षण संस्थांमध्ये कोट्यावधी रुपयांची देयके काढून ते राष्ट्रीयकृत बँक मधून खाजगी बँकांमध्ये पैसे वर्ग केले?**

**यामध्ये काही दलालांचाही समावेश, बेकायदेशीर शिक्षक भरती मध्ये केले हात काळे?**

### शिक्षक भरती घोटाळा उघडकीस आणून दोषींवर कारवाई होणार का?



बीड जिल्हा परिषदेचे कर्तव्यदक्ष मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून संपूर्ण बीड जिल्हा आपल्याकडे पाहत आहे. आपण शिक्षक भरती घोटाळ्या प्रकरणांमध्ये शिक्षणाधिकारी प्राथमिक व माध्यमिक व वेतन अधीक्षक प्राथमिक व माध्यमिक यांच्या कार्यालयातील आवक जावक रजिस्टर आपल्या ताब्यात घ्यावे, जेणेकरून ज्यांनी खाजगी शिक्षक भरती घोटाळा केलेल्या आहे. त्या मधले अधिकारी हे पुरावे नष्ट करण्याच्या प्रयत्नात आहेत. यामुळे आपण कर्तव्यदक्षता दाखवावी आणि शिक्षक भरती घोटाळा उघडकीस आणून दोषींवर कारवाई करावी तसेच कारवाई होणार का? हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

"नागपूर जिल्ह्यापेक्षाही मोठा खाजगी शिक्षक भरती घोटाळा हा बीड जिल्ह्यात घडला आहे. नागपूर जिल्ह्यामध्ये संबंधित भ्रष्टाचार अधिकाऱ्यावरती गुन्हे दाखल होऊन त्यांच्यावर कारवाई केली जाते. तर बीड जिल्ह्यामध्ये शिक्षण विभागातील भ्रष्टाचार करणारे संबंधित अधिकाऱ्यावरती का कारवाई होत नाही. तरी महाराष्ट्र राज्याचे शिक्षण मंत्री दादा भुसे साहेब यांनी यासंदर्भात शिक्षण प्रधान सचिव व शिक्षण आयुक्त पुणे यांना तात्काळ सदरील प्रकरणांमध्ये चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याचे आदेश द्यावे.

**या प्रकरणाची सखोल चौकशी केली तर जिल्ह्यातील खूप मोठा शिक्षक भरती घोटाळा व थकीत वेतन घोटाळा उघडकीस येईल?**

**शिक्षणमंत्री भुसे साहेब, तात्काळ सदरील प्रकरणांमध्ये चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याचे आदेश द्या?**

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हा शिक्षक भरती घोटाळ्यामध्ये प्राथमिक व माध्यमिक जिल्हा परिषद बीड यामध्ये ज्यांनी बेकायदेशीर संच मान्यता दुरुस्ती करून दिल्या. शिक्षण संचालक प्राथमिक शिक्षण विभाग पुणे व संच मान्यता अधिकारी व कर्मचारी तसेच शिक्षण संचालक माध्यमिक शिक्षण विभाग पुणे व शालार्थ आयडी ज्यांनी दिले ते तत्कालीन शिक्षण उपसंचालक औरंगाबाद छत्रपती संभाजी नगर बीड जिल्ह्यामध्ये जेवढ्या काही संच मान्यता दुरुस्त करण्यात आले व नवीन पद भरण्यात आले खाजगी संस्थांमध्ये यांची जुनी संच मान्यता व दुरुस्ती करून आलेल्या संच मान्यता यामध्ये हा सर्व प्रकार उघडकीस येत आहे.

बीड जिल्ह्यातील शिक्षण विभाग प्राथमिक व माध्यमिक मध्ये विनाअनुदानित वरून ४०% अनुदानित वर नियुक्त देण्यात आल्या तसेच अंशतः अनुदानित वरून शंभर टक्के पदावर नियुक्त देण्यात आल्या काही तर शिक्षकांच्या नियुक्ती या २०१२ च्या पूर्वी दाखवून त्यांचे थकीत वेतन बीड जिल्ह्यातील अनेक शिक्षण संस्थांमध्ये





कोट्यावधी रुपयांचे देयके काढली व सदरील देयके हे राष्ट्रीयकृत बँकेमधून खाजगी बँकांमध्ये पैसे वर्ग केलेले आहेत. या सर्व बाबींची चौकशी केल्यास बीड जिल्ह्यातील खूप मोठा शिक्षक भरती घोटाळा व थकीत वेतन घोटाळा उघडकीस येईल, शिक्षण विभाग मंत्रालय मुंबई यांचे सक्तीचे आदेश असताना पवित्र पोर्टलने नवीन शिक्षक भरती करण्याचे आदेश असताना सुद्धा शासनाचे नियम डाउनलोड अधिकाराचा गैरवापर करून संबंधित शिक्षणाधिकारी प्राथमिक भगवान फुलारी चे माध्यमिक नागनाथ शिंदे व वेतन अधीक्षक प्राथमिक ढाकणे व वेतन अधीक्षक माध्यमिक खटावकर तसेच तत्कालीन उपसंचालक शिक्षण विभाग औरंगाबाद व शिक्षण संचालक प्राथमिक व शिक्षण संचालक माध्यमिक या सर्वांनी मिळून थकीत वेतन संच मान्यता कायम मान्यता या सर्व बाबींमध्ये वरील अधिकारी संस्थाचालक व या प्रकरणांमध्ये काही दलालांचाही समावेश आहे. व ज्यांनी सदरील बेकायदेशीर शिक्षक भरती मध्ये ज्यांनी हात काळे केले व ज्या संस्थेचे काम करण्यासाठी काही दलालांनी स्वतःची सुद्धा घर भरले व यामध्ये प्रभारी गटशिक्षणाधिकारी केज बेडस्कर यांनी तर शिक्षणाधिकारी प्राथमिक जिल्हा परिषद बीड यांचा पूर्ण आर्थिक देवाण-घेवानचा कार्यभार सांभाळा व काही शिक्षक संस्थाचे काम करून देतो म्हणून मोठी

▶ पान २ वर



## डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कमानीसाठी दौनापूर येथील बौद्ध समाजाच्या उपोषणाचा आज तिसरा दिवस

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार व बहुजन समाजाचे उद्धारक डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने कमान उभारण्यासाठी परवानगी द्यावी या मागणीसाठी आज दिनांक २० मे पासून बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बौद्ध समाजाच्या वतीने महिला, लेकरा बाळासह उपोषण सुरू करण्यात आले होते. या उपोषणाचा आज तिसरा दिवस असून बीड जिल्ह्यातील बहुजन समाजाच्या अनेक नेत्यांनी उपोषणाला भेट देऊन आपला पाठींबा दिला. व कमानीला परवानगी न दिल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा या नेत्यांनी दिला आहे.

याबाबत परळी तालुक्यातील दौनापूर येथील बौद्ध समाजाने बीड जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले होते .या निवेदनात म्हंटले होते की,दिनांक ५ एप्रिल २०२५ रोजी दौनापूर येथील बौद्ध समाजाच्या वतीने ग्रामपंचायतीला बौद्ध वस्ती समोरील रस्त्यावर प्रवेशद्वार अर्थातच कमान उभारण्याची परवानगी मागण्यासाठी अर्ज केला.

▶ पान २ वर

## बीड जिल्ह्यात पथकाने रोखले एकत्र होणारे दोन बालविवाह

बीड । प्रतिनिधी

२२.५ .२०२५ रोजी, पोलीस स्टेशन बीड ग्रामीण हद्दीत पांगरबावडी या गावी सखाराम मोगलाजी संकोड, व गंगाराम गंगाधर अनारसे यांचे घरी एकत्र दोन बालविवाह होत असल्याचे गोपनीय माहिती AHTU पथकास मिळाली होती,त्या नुसार AHTU पथकाने सदर ठिकाणी सामाजिक कार्यकर्ते व पांगर बावडी गावाचे बालविवाह अधिकारी यांनी भेट दिली असता लग्नातील दोन्ही नवरी मुली अल्पवयीन मिळून आल्या, शिक्षणाचा अभाव, भटके जीवन, तसेच कायद्याबद्दलचे अज्ञान, तरुण मुलींना वयात आल्यानंतर सांभाळायचे कसे? अशी अनेक कारणांमुळे मुलीचा विवाह लावत असल्याचे पालकांनी



सांगितले, दोन्ही कडील आई वडील नातेवाईक, यांना AHTU पथकाने कमी वयातील लग्नामुळे मुलींच्या शरीरावर होणारे गंभीर परिणाम, लहान वयात पडणाऱ्या जबाबदाऱ्या, कुपोषित अपत्य,

▶ पान २ वर

"बीड जिल्ह्यामध्ये सामाजिक कार्यकर्ते तत्त्वशील कांबळे यांनी रक्तदान शिबिर ते बालविवाह सामाजिक कार्यात स्वतः ला झोकवून दिलेला आहे तत्त्वशील कांबळे यांनी या अगोदर सुद्धा अनेक बालविवाह रोखलेले आहेत तर तत्त्वशील कांबळे यांच्या कार्याचं सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

## बीड जिल्हा पोलीस दलातील एकाच वेळी ६०६ कर्मचाऱ्यांच्या बदल्या बीड जिल्ह्याच्या इतिहासात पहिल्यांदाच एवढ्या मोठ्या बदल्या

# अनेक कर्मचाऱ्यांची उचलबांगडी

**बीड जिल्हा पोलीस प्रशासनात पहिल्यांदाच पारदर्शक बदल्यांचा आदर्श एसपी नवनीत कॉवत यांचे कौतुक**



बीड । प्रतिनिधी

स्वर्गीय संतोष देशमुख यांच्या हस्ते प्रकरणानंतर बीड जिल्ह्यातील पोलीस प्रशासनाला मोठ्या बदनामीला महाराष्ट्रामध्ये सामोरे जावं लागलं होतं त्यातच आता बीड जिल्ह्यातील पोलीस प्रशासन यातील अनेक अधिकारी कर्मचारी अन् वाल्मीक कराड आणि पुढारी ही सांगड झाली असून, त्यातली त्या पोलीस म्हटलं की, आणखी जास्त कामाचा माणूस यामुळे पुढारी प्रतिष्ठा लावून त्यास आपल्याच ठाण्यात ठेवतो यामुळे अनेकजण बऱ्याच वर्षांपासून एकाच ठिकाणी चिकटून बसले होते व आपल्या पदाचा गैरवापरबिनधास्त करत होते. पण पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी कोणाचेच न ऐकता नियमाप्रमाणे आणि कसलाही घोडेबाजार न होऊ देता पोलीस दलातील ६०६ कर्मचाऱ्यांच्या बदल्या केल्या आहेत.

एकाचवेळी इतक्या बदल्या होणे ही जिल्ह्यातील ऐतिहासिक घटना असल्याची तसेच कोणाच्या मदतीचा फायदा झाला नाही. या पारदर्शक बदल्या प्रकाराने अनेकांना धक्का बसला असून सुजान नागरिकांमधून मात्र याबाबत पोलीस अधीक्षक यांचे कौतुक करीत वेल्डन एसपी साहेब अशी प्रतिक्रिया व्यक्त केली जात आहे. कोणतीही वशिलेबाजी, घोडेबाजाराला थारा न देता. पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी नियमाप्रमाणे आणि कोणाच्या ही आशीर्वादाने खुर्चीला चिकटून बसलेल्या पोलीस कर्मचारी अधिकारी यांच्या बदल्या केल्या आहेत. आज एकूण ६०६ बदली झालेल्या कर्मचाऱ्यांची यादी बाहेर आली आहे. या प्रकरणी पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत यांनी स्वतः लक्ष घालून कालावधीपूर्ण झालेले आणि निकषात बसणाऱ्या कर्मचारी आणि सहाय्यक फौजदारांना बदलीपासून संरक्षण मिळणार नसल्याचे आधीच जाहीर केले होते. अनेक पोलीस कर्मचारी आणि अधिकाऱ्यांनी तरीही स्वतःची खुर्ची टिकविण्यासाठी वरिष्ठ अधिकारी पोलीस अधीक्षक कार्यालयातील अनेक क्लर्क व राजकीय नेते


▶ पान २ वर

# बीड गोळीबार प्रकरणी आरोपीस जामीन मंजूर

## अ‍ॅड.अविनाश गंडलेंचा प्रभावी व अभ्यासपूर्ण युक्तिवादाने मकोका मधून देखील सुटका

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील बार्शी नाका, प्रकाश आंबेडकर नगर मध्ये दिनांक १३/१२/२०२४ रोजी रात्री दोन वाजण्याच्या सुमारास अभिषेक विश्वास डोंगरे यांच्या घरी जावून गोळीबार केल्या प्रकरणी अक्षय आठवले, मनिष क्षीरसागर, आशिष आठवले, प्रसाद धिवार विरोधात गन्हा दाखल झाला होता. वरील आरोपीच्या हातात पिस्टल होते व प्रसाद धिवार हा घर दाखवत होता, अशा प्रकारची फिर्याद फिर्यादीने पेठ बीड पोलीस स्टेशन येथे दिली होती. त्यामध्ये दिनांक १९/०६/२०२४ रोजी प्रसाद धिवार सोबत झालेल्या भांडणाचे कारण काढुन दिनांक १३/१२/२०२४ रोजी घरावर गोळीबार केला अशा प्रकारची फिर्याद दिली होती. सदरील आरोपींवर



मोक्का लावण्यात आला होता. यामधील आरोपी प्रसाद धिवार यांचा मोक्का कमी करण्यात आला. आरोपी प्रसाद धिवार याचेवर कलम १०९, १९१ (२), १९१ (३), १९०, ६१ (२), ११५ (२), ३५२, ३५१ (२), ३३३ बी.एन.एस. नुसार व कलम ३, २५, २७ शस्त्र अधिनियम कायद्या अंतर्गत तसेच कलम १३५ महाराष्ट्र पोलीस अधिनियम नुसार गुन्हा नोंद करण्यात आला होता. आरोपी तर्फे प्रसिध्द विधिज्ञ अ‍ॅड. अविनाश पं. गंडले यांच्या मार्फत जामीन दाखल करण्यात आला होता. आरोपीचे वतीने अ‍ॅड. अविनाश पं. गंडले यांनी केलेला प्रभावी व अभ्यासपुर्ण युक्तीवाद ग्राह्य धरुन मा. १ ले जिल्हा व सत्र न्यायाधिश बीड यांनी जामीन मंजुर केला. सदरील प्रकरणाकडे संपुर्ण जिल्ह्याचे लक्ष लागलेले होते. आरोपी तर्फे अ‍ॅड. अविनाश पं. गंडले यांनी काम पाहिले, त्यांना याकामी अ‍ॅड. इम्रान ए. पटेल, अ‍ॅड. सुरक्षा जावळे, अ‍ॅड. बप्पा माने, अ‍ॅड. के.डी. मस्के, अ‍ॅड. राजेश बी. शिंदे, अ‍ॅड. एस.जे. गिरी, अ‍ॅड. शुभम सरवदे, यांनी सहकार्य केले.

# मुख्याधिकारीचे बदलीसाठी खुर्शीद आलम यांची उपमुख्यमंत्र्यांकडे दुबार मागणी

बीड । प्रतिनिधी

आज दि.१९/५/२०२५ रोजी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून बीडच्या दौऱ्यावर आले होते यावेळी बीड नगरपरिषदेचे माजी सभापती तथा शरदपवार राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष खुर्शीद आलम यांनी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्याकडे आज दुसऱ्यांदा नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी श्रीमती नीता अंधारे यांची तातडीने बदली करावी अशी मागणी केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की जेव्हा पासून बीड नगरपरिषदेत मुख्याधिकारी म्हणून श्रीमती निता अंधारे आल्या आहेत. तेव्हापासून बीड शहरात सहा सहा महिने साफसफाई होत नाहीयेत त्यामुळे स्वच्छतेचा बट्ट्याबोळ झालेला आहे, पंधरा ते २० विस दिवस पिण्याचे पाणी मिळत नाहीये, आठ आठ महिने विद्युत खंब्यावर पथदिवे बंद असतात, झ.ढ.ठ रजिस्टराचे लेज्ञ लळपवळपस न झाल्यामुळे रजिस्टरांचा बुग्गा झाललेला आहे म्हणून झढठ मिळत नाहीये त्यामुळे अनेक गरीब घरकुलापासुन वंचित झाले आहेत, नगरपरिषदेच्या प्रत्येक विभागात भ्रष्टाचार दिसून येते, विकास होतांना दिसत नाहीये मात्र कोट्यवधीचे बिले निघत आहेत. जुनेच कामाचे नवे किंवा डबल बिले



दिली जाते असे वाटत आहेत. बीड नगरपरिषदेत प्रचंड प्रमाणात भ्रष्टाचार वाढलेला दिसून येत आहे. नगरपरिषदेचा भोंगळपणा आणि भ्रष्टाचार दररोज अनेक वर्तमानपत्रांमध्ये दिसून येत आहेत, नाल्यावरचे अतिक्रमणे काढतांना धनदांडग्यांचे सोडून गोरगरिबांचेच अतिक्रमण काढले जाते आणि विशेष म्हणजे नाल्यावरचे अतिक्रमणे काढल्यानंतर गटारी साफ केले जात नाहीये, मुख्याधिकारी अंधारे प्रशासकाच्या नावाखाली मनमानी अंधाधुंद कारभार करत आहेत.

स्वच्छतेसाठी, पाणीसाठी, लाईटसाठी आणि रस्ते नाल्यांचे विकास कामांसाठी मुख्याधिकारी निता अंधारे यांची तातडीने बदली करणे अतिशय आवश्यक आहे म्हणून आज दुसऱ्यांद उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्याकडे नागरिकांना मुलभूत सुविधेपासुन वंचित ठेवणार्या श्रीमती नीता अंधारे यांची तातडीने बदली करावी, अशी मागणी खुर्शीद आलम यांनी उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री यांच्या कडे केली आहे तसेच दुसऱ्यांदाही केलेली मागणी मान्य न झाल्यास जन दोंलन करण्यात येईल असा इशारा निवेदनाद्वारे बीड नगरपरिषदेचे माजी सभापती तथा शरदपवार राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष खुर्शीद आलम यांनी दिला आहे.

# बीड शहरातील नागरी समस्या तातडीने सोडवा

## डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली रा.काँ.च्या शिष्टमंडळाचे सीओंचे निवेदन

बीड । प्रतिनिधी

शहरातील नागरी समस्या दिवसेंदिवस गंभीर होत असून, त्यावर तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार गट) शिष्टमंडळाने नगरपरिषद मुख्याधिकारी नीता अंधारे यांच्याकडे गुरुवारी (दि.२२) केली. पक्षाचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखालील या शिष्टमंडळात माजी नगरसेवकांचा समावेश होता. विविध विभागांतील समस्यांवर ठोस कृती आराखडा राबवावा, असेही निवेदनात म्हटले आहे.



निवेदनात पुढे म्हटले आहे की, शहरातील मान्सूनपूर्व स्वच्छता, नालेसफाई, पथदिवे, रस्त्यांची दुरवस्था, पाणी पुरवठ्याची विस्कळीत व्यवस्था, अपूर्ण गाळे व बाजारपेठांची कामे, तसेच आरोग्य सुविधा आणि कर वसुलीतील अडचणी आदी मुद्द्यांवर शिष्टमंडळाने मुख्याधिकाऱ्यांना धारेवर धरले. सध्या शहरातील अनेक मुख्य नाले कचऱ्यामुळे तुंबले असून, त्यामुळे डास, दुर्गंधी व आरोग्याच्या समस्या वाढल्या आहेत. हे नाले तातडीने यंत्राच्या सहाय्याने साफ करण्यात यावेत. तसेच, नव्या घंटागाड्या, जेसीबी व कम्पॅक्टर खरेदी करून स्वच्छतेसाठी पायाभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी करण्यात आली.

शहरातील अनेक भागांमध्ये पथदिवे बंद अवस्थेत आहेत तर काही भागांत दिवसा दिवे सुरू असतात. हायमास्ट दिव्यांचीही अवस्था दयनिय असून, त्यांची त्वरित दुरुस्ती आवश्यक आहे. सौर ऊर्जेचा वापर वाढवून मिनी हायमास्ट दिवे, स्मशानभूमीत प्रकाशयोजना व नगरपरिषद इमारतीवर सौर प्रकल्प बसविण्याचेही सुचविण्यात आले.

पाणी पुरवठा विभागातील कंत्राटी कर्मचाऱ्यांचे वेतन वेळेवर व्हावे, माजलगाव व बिंदुसरा प्रकल्पाच्या मदतीने नव्या पाणी योजनांचा प्रस्ताव तयार करून शासनाला सादर करावा, अशा सूचना शिष्टमंडळाने केल्या. श्रीरामनगर येथील जुन्या पाण्याच्या टाकीऐवजी नवीन टाकी उभारण्याची, तसेच अनधिकृत नळजोडण्या नियमित करून कराच्या कक्षेत आणण्याची मागणी करण्यात आली.

बांधकाम विभागाच्या कामांबाबतही विविध सूचना देण्यात आल्या. यशवंत नाट्यगृह, आंबेडकर सांस्कृतिक भवन यांची दुरुस्ती करावी, प्रमुख चौकांचे सुशोभीकरण करावे, नव्या भाजी मंडई व गाळ्यांचे बांधकाम पूर्ण करून सुरू करावे, तसेच रस्त्यांवरील खड्डे, सिमेंट रोडच्या सांधेबांध तातडीने कराव्यात. बेघर महिला निवारा गृह व नव्या स्मशानभूमीची उभारणी गरजेची असल्याचे सांगण्यात आले.

आरोग्य विभागातील प्राथमिक आरोग्य केंद्रे अपुरी पडत असल्याने नव्या केंद्रांचा प्रस्ताव शासनाकडे पाठवावा, अशी सूचना करताना पेठ बीड, शाहूनगर भागांसाठी आरोग्य केंद्रांची गरज अधोरेखित करण्यात आली. कर वसुलीसाठी डिजिटल पद्धतीचा वापर करून गुगल पे, गुगल पेसारखी प विकसित करावी, तसेच व्यवसायिक गाळ्यांची नव्याने नोंदणी करून नगरपरिषदेला उत्पन्न वाढवण्याचा सल्ला देण्यात आला. शहराच्या वाढत्या लोकसंख्येनुसार फायर ब्रिगेडची नवी वाहने, भुयारी गटार योजना व एसटीपीसाठी जागा निश्चित करणे, रस्त्यांच्या दुतर्फा वृक्षारोपण व मियावाकी पद्धतीने दाट लागवड करणे अशाही सूचनांचा समावेश निवेदनात करण्यात आला.

शहरातील नागरिकांनी वारंवार मांडलेल्या या समस्या तातडीने सोडवण्यात याव्यात, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने केली आहे. यावेळी माजी नगरसेवक बाबुराव दुधाळ, गणेश वाघमारे, भीमराव वाघचौरे, नरसिंग नाईकवाडे, सादेक जमा, भास्करराव जाधव, इकबाल शेख, विकास जोगदंड, प्रेम चांदणे, सतिश पवार, राणा चौहान, मुन्ना इनामदार, रवींद्र कदम, शुभम धुत, जैतुल्ला खान, बिभीषण लांडगे, नितिन साखरे, दत्ता जाधव, नसीर अन्सारी, बाळासाहेब आंबेकर, साऊद भाई, महेश गर्जे, नागेश तांबारे, मंगेश धोंगडे, विनोद हातागळे, डॉ.रमेश शिंदे, विठ्ठल गुजर, गजानन जवकर, शुभम कातांगळे, नामदेव गायकवाड, विशाल राऊत, भीमराव दळे, दगडू म्हेत्रे, प्रकाश कानगावकर, विद्याभूषण बेदरकर, जाफर इनामदार यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी, नगरपरिषदेचे सर्व विभागाचे प्रमुख, नागरिक उपस्थित होते.

पान १ वरून...

### बीड जिल्ह्यात शिक्षक भरतीचे मोठे रॅकेट सक्रिय, संस्था...

आर्थिक उलाढाल केली आहे. सर्व प्रकार लवकरच शिक्षण आयुक्त पुणे यांच्या अधिपत्याखाली चौकशी समिती नियुक्त करून सर्व भांडाफोड करून दोषींवर कारवाई करावी. शिक्षण विभागात मोठ्या प्रमाणात गैरप्रकार सुरू आहे.

यामध्ये खाजगी शिक्षण संस्था व अल्पसंख्यांक शिक्षण संस्था अंतर्गत चालविण्यात येणाऱ्या शाळांमध्ये शासनाचे सर्व नियम डावलून संस्था चालकांकडून आर्थिक दिवाण–घेवाण करून शिक्षक भरती करणे तसेच शिक्षकांना कायम मान्यता देणे अशा प्रकारची बेकायदेशीर कामे करोडो रुपयांचा भ्रष्टाचार केला आहे. तसेच याच प्रकारे त्यांच्या अंतर्गत येणारी शिक्षण विभागाची इतर कामांमध्येही ते पैसे घेतल्याशिवाय सही करत नाहीत अशा प्रकारे त्यांनी अमाप बेकायदेशीर संपत्ती गोळा केलेली आहे. याची सखोल चौकशी होणे गरजेचे आहे.

### डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कमानीसाठी दौनापूर येथील...

त्यावर ग्रामपंचायतीने परवानगी तर दिलीच नाही उलट सरपंच राजेभाऊ प्रभाकर आघाव यांनी ग्रामपंचायतीचा ठराव घेतला.व ठरावा द्वारे कमानीला परवानगी देण्यात येणार नाही असे सांगितले होते.त्यानंतर दौनापूर येथील बौद्ध समाजाने भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रवेशद्वार,( कमान) करण्याची परवानगी द्यावी अन्यथा २० मे २०२५ पासून बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषणाचा इशारा दिला होता.

आज उपोषणाचा दुसरा दिवस आहे.मिलिंद घाडगे यांच्या मार्गदर्शनाखाली चाललेल्या आमरण उपोषणास बहुजन विकास मोर्चाचे संस्थापक अध्यक्ष बाबुरावजी पोटभरे, राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते दयानंद भाऊ स्वामी, वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे आंबेडकर चळवळीचे जेष्ठ नेते बबनराव वडमारे, वंचित बहुजन आघाडी जिल्हा नेते धम्मानंद साळवे, वंचित बहुजन आघाडीच्या महिला नेत्या पुष्पाताई तुरुकमारे, बहुजन समाज पार्टीचे जिल्हाध्यक्ष प्रशांतजी वासनिक, ऑल इंडिया पँथर सेनेचे जिल्हाध्यक्ष नितीन सोनवणे, वंचित बहुजन आघाडीचे महासचिव ज्ञानेश्वर कवठेकर वंचित बीड जिल्हा नेते पुरुषोत्तम वीर, ज्येष्ठ नेते अर्जुन उजगरे, संभाजी ब्रिगेडचे नेते सेवकराम जाधव, जिल्हा प्रतिनिधी सुनील डोंगरे, पत्रकार केशव मुंडे, बहुजन विकास मोर्चाचे जिल्हाध्यक्ष प्रशांत ससाने, एकतावादीचे जिल्हाध्यक्ष शैलेंद्र पोटभरे, आर.के. आरसुळे, अंकुश गंगावणे, विठ्ठल ढोकणे, नितीन शिंदे, भास्कर वाघमारे, वंचित ज्येष्ठ नेते भीमराव पायाळ, पत्रकार राजू जोगदंड, पत्रकार मिलिंद आदमाने, पत्रकार संतोष राजपूत, आझाद क्रांती सेना बीड कृष्णा पाटोळे इत्यादी अनेक मान्यवरांनी उपोषण स्थळी भेट देऊन पाठिंबा जाहीर केला.

### बीड जिल्ह्यात पथकाने रोखले एकत्र होणारे दोन बालविवाह

शिक्षणाचे महत्त्व अशा सर्व समुपदेशन करून मुलीचा विवाह अठरा वर्षे झाल्याशिवाय लावून देणार नाही, असे हमीपत्र घेवून सदरचे दोन्ही बालविवाह रोखण्यात आले.

ही कारवाई पोलीस अधीक्षक श्री.नवनीत काँवत, अप्पर पोलीस अधीक्षक श्री. सचिन पांडकर यांचे मार्गदर्शनाखाली AHTU पथक प्रमुख –झख वर्षा व्हगाडे, पोलीस अंमलदार अशोक शिंदे, प्रदीप येवले, मनीषा खरमाटे, रूपाली टोणे यांचेसह बालविवाह अधिकारी ग्रामसेवक एस. बी. सपकाळ, व सामाजिक कार्यकर्ते तत्त्वशील कांबळे यांनी केली.

### अनेक कर्मचाऱ्यांची उचलबांगडी

यांच्याकडे धाव घेता आली नाही.

एसपींनी बदल्यांमध्ये झुकते माप देण्यासाठी सूचना करायला लावल्या. अगदी स्वतः नवनीत कॉवत यांनी बदल्यांसाठी अनेकांशी संवाद साधताना कर्मचाऱ्यांचे म्हणणेही ऐकून घेतले. पण जे कर्मचारी दीर्घकाळापासून एकाच विभागात आणि शहरात कार्यरत होते त्यांना थेट दणका दिल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. पोलीस दलात पहिल्यांदाच ६०६ कर्मचाऱ्यांची थेट खांदेपालटच करण्यातआली असून एसपींनी स्वतः बदल्यांसाठी तीन दिवसांपासून वेळ दिला होता अशी माहिती आहे. ते कार्यालयात आले तरी त्यांचे सर्व लक्ष बदलीपात्र कर्मचाऱ्यांच्या बाबतीतच होते. नवनीत कॉवत यांनी बीड जिल्ह्यात पोलीस कर्मचाऱ्यांच्या बदल्यांमध्ये घालून दिलेल्या वस्तुपाठ सध्या जिल्ह्यात चर्चेचा विषय ठरला असून एसपींना लोकप्रतिनिधींना देखील मी कोणाचेच चुकीचे ऐकणार नसल्याचा देखील या माध्यमातून संदेश दिल्याचे पाहायला मिळत आहे.

नवनीत कॉवत यांच्या काळातील तक्रार निवारण दिवस, क्युआर कोड, प्रत्येक पोलीस ठाण्यात सायबर डेस्क नंतर आता पारदर्शक बदल्या हे प्रकरण आदर्शवत असल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली जात आहे. नवनीत सावंत यांच्याकडे आज बीड जिल्ह्यातील जनतेने चांगल्या भावनेने नवनीत काम त्यांचे अभिनंदन केले आहे की बीड जिल्ह्यामध्ये पहिल्यांदाच महाराष्ट्रामध्ये गाजलेले बीड जिल्ह्यातील सहाशे सहा कर्मचाऱ्यांच्या बदल्या प्रकरणांमध्ये सर्वसामान्यांना कर्मचाऱ्यांना न्याय मिळाला आणि चांगल्या पोलीस कर्मचाऱ्यांना पोलीस ठाणे मिळाले तर नवनीत कॉवत यांच्या कार्यकाळामध्ये पोलीस प्रशासनातील अनेक अधिकारी कर्मचारी आनंदाचे वातावरण मध्ये पाहायला मिळत आहेत.

# वाचकांमध्ये आत्मविश्वास निर्माण करणारी लेखिका नसीम जमादार यांची बालकादंबरी सावी –परीक्षण खाजाभाई बागवान


लेखिका नसीम जमादार कोल्हापूर जिल्ह्यातील प्रसिद्ध बालसाहित्यिका आहेत. त्या पन्हाळा येथील नेबापूर न्यू हायस्कुलमध्ये शिक्षिका म्हणून कार्यरत आहेत आणि आपल्या कर्तव्याचे यशस्वी पालन करत आजवर सुमारे तीस वर्षे पूर्ण केले आहेत. या कालावधीत त्यांनी विद्यार्थ्यांसोबत सतत संपर्क ठेवत त्यांना केवळ शिक्षणाचे धडेच दिले नाहीत, तर समाजात जबाबदार नागरिक म्हणून कसे वागावे याचे संस्कारही दिले आहेत. शिक्षण केवळ शालेय अभ्यासक्रमापुरते मर्यादित न ठेवता, विद्यार्थ्यांना भारताचे भविष्य म्हणून घडवण्याचे महत्त्वाचे कार्य शिक्षक करीत असतात.जेव्हा शिक्षक आपल्या कर्तव्याच्या जोडीने लेखणी उचलून आपल्या अनुभवांचे लेखन करू लागतो, तेव्हा सावी...एका संघर्षमय जीवनाची गाथा यांसारखी संस्कारक्षम कादंबरी आकार घेत असते.

लेखिका नसीमा जमादार यांनी सावी या बालकादंबरीतून स्वतःचा अनुभव मांडण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे. यात एक विद्यार्थी शिक्षकाच्या छोट्या छोट्या प्रोत्साहनामुळे आत्मविश्वास पुन्हा मिळवत जातो आणि पुढे जाऊन एक जबाबदार व यशस्वी नागरिक म्हणून समाजात वावरतो. सोबतच तो समाजाच्या हितासाठी हातभार लावत राहतो–शिक्षकासाठी याहून मोठे समाधान काय असू शकते!लेखिका नसीम जमादार यांनी लिहिलेल्या सावी या कादंबरीचा सारांश असाच आहे. या कादंबरीत लेखिका सहाय्यक नायिकेच्या भूमिकेत दिसतात, आणि मुख्य भूमिकेत सावी ही हाताश, आत्मविश्वास हरवलेली, मागच्या बाकावर बसणारी विद्यार्थिनी आहे. ही कथा सावीच्या जीवनप्रवासाची नसून तिच्या शालेय प्रवासाची आहे–हरवलेला आत्मविश्वास पुन्हा मिळवण्याचा आणि त्यानंतर तिच्या बदललेल्या स्वरूपाचा. लेखिकेने आपल्या ओघवत्या भाषाशैलीद्वारे विविध प्रसंगांचे प्रभावी चित्रण करत हा प्रवास वाचकांसमोर उलगडला आहे.या कादंबरीच्या मुखपृष्ठावर एक विद्यार्थिनी आपल्या शाळेसमोर हातात पुस्तकं घेऊन उभी आहे, असे चित्रकार यशवंत पेंटर यांनी रेखाटले आहे. तसेच, कादंबरीतील विविध प्रसंगांनुसार चित्रकार अजय ढवळे यांनी आतील चित्रे साकारली आहेत. या कादंबरीसाठी ज्येष्ठ साहित्यिक माधव राजगुरू यांनी सारगर्भ प्रस्तावना लिहिली असून, ज्ञानपीठ बालसाहित्य पुरस्कारप्राप्त साहित्यिक एकनाथ आव्हाड यांनी कादंबरीला पाठराखण केली आहे.

सावी ही अशी विद्यार्थिनी आहे जी आठवीपर्यंत पोहोचली असली तरी घरच्या जबाबदारीमुळे तिचे अभ्यासाकडे आणि स्वतःकडे पुरेसे लक्ष देता आले नाही. त्यामुळे तिचे स्वतःचे नाव व्यवस्थित उच्चारणे आणि लिहिणे जमत नव्हते, तसेच कपडे आणि केस नीटनेटके ठेवणेही तिला कठीण वाटत होते. तिचे आई–वडील शेतीच्या कामात व्यस्त असल्याने घरची आणि भावाची संपूर्ण जबाबदारी सावीवरच होती. या जबाबदारीच्या ओझ्याखाली तिचा आत्मविश्वास हरवला होता. जेव्हा शिक्षिकेची सावीशी पहिली भेट होते, तेव्हा शिक्षिका सावीचा अवतार पाहून चकित होतात. हे चित्र शिक्षिकेच्या मनातील मातृत्वाला साद घालते, आणि त्याच क्षणी सावी व शिक्षिकेचा एका नव्या प्रकाशाकडे प्रवास सुरू होतो. या कादंबरीतील प्रसंग सत्य घटनांवर आधारित आहेत, तसेच लेखिकेचा स्वतःचा अनुभवही त्यात प्रतिबिंबित होतो, हे लेखिका नसीमा जमादार यांच्या मनोगतामधून स्पष्ट होते. लेखिकेने प्रत्येक प्रसंग सहज आणि जिवंत चित्रणासह लिहिला आहे, त्यामुळे वाचक आणि विद्यार्थी दोघेही ही कादंबरी एका दमात वाचण्याचा मोह टाळू शकत नाहीत.

माधव राजगुरू यांनी प्रस्तावनेत असे नमूद केले आहे की, सावी तिच्या लग्नापर्यंत मुलांच्या आवडीची असेल, परंतु लग्नानंतर तिला शाळेतील शिक्षकांनी दिलेल्या सामाजिक शिक्षणाच्या मदतीने स्वतःच्या स्वबळावर गरुडझेप घ्यायला मिळते. लेखिकेने कादंबरीत हे प्रभावीपणे चित्रित केले आहे. हेच मुलांना त्यांच्या स्वतःच्या बळावर उभे राहण्यासाठी आत्मविश्वास किती महत्त्वाचा असतो, याची जाणीव करून देईल. एक वाचक म्हणून हे माझे मत आहे.होय, हीच या कादंबरीची खरी ताकद आहे! सावीच्या प्रवासात केवळ तिच्या शिक्षणाची वाढच होत नाही, तर तिच्या व्यक्तिमत्त्वाचा विकासही होतो. सुरुवातीला जबाबदारीच्या ओझ्याखाली दबलेली आणि आत्मविश्वास हरवलेली सावी जसा शिकत जाते, तसतसा तिच्या जगण्याचा दृष्टिकोन बदलतो. छोट्या गोष्टींमध्ये आनंद शोधण्याची तिची वृत्ती, शाळेविषयी तिचे वाढते प्रेम आणि स्वतःला स्वीकारण्याचा तिचा प्रवास–हे सारेच अत्यंत प्रेरणादायी आहे. हा बदल सहजपणे वाचकांच्या मनाला भिडतो आणि हरवलेल्या आत्मविश्वासाला पुनर्जिवीत करण्याची शक्ती शिक्षणात असते, हे अधोरेखित करतो.

सावी... एका संघर्षमय जीवनाची गाथा ही कादंबरी केवळ बालवाचकांसाठी प्रेरणादायी ठरणारी नाही, तर प्रौढ वाचकांनाही अंतर्मुख करणारी आहे. तिची रेखीव मांडणी, प्रसंगांचे प्रभावी वर्णन आणि परिस्थितीनुसार असलेली चित्रमय मांडणी कादंबरीला अधिक जिवंत बनवते. विशेषतः रंगीत पानांमुळे




बालवाचकांना ही कादंबरी अधिक आकर्षित करते.कथानकातील प्रत्येक प्रसंग एक नवीन शिकवण आणि जीवनाचा बोध देतो. लेखिका नसीम जमादार या संस्कारक्षम बालसाहित्यिक म्हणून नावारूपाला येत आहेत. त्यांच्या नो मेन्स लँडया बाल एकांकिका संग्रहाच्या यशस्वी कामगिरीनंतर सावी ही बालकादंबरीसुद्धा बाळसाहित्य क्षेत्रात महत्त्वपूर्ण स्थान निर्माण करेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जाते.

आजच्या पिढीला वाचनाची गोडी निर्माण करण्याचे मोठे आव्हान आहे. मोबाईल आणि डिजिटल माध्यमांच्या आहारी गेलेल्या मुलांना दर्जेदार बालसाहित्य वाचनाची प्रेरणा देण्यासाठी अशा पुस्तकांची नितांत गरज आहे. लेखिका नसीम जमादार अशाच उत्तम साहित्यनिर्मिती करत राहोत आणि वाचनसंस्कृतीला नवसंजीवनी मिळो, यासाठी त्यांना पुढील प्रवासासाठी शुभेच्छा!

परीक्षण/समीक्षण : खाजाभाई बागवान, सोलापूर
पुस्तकाचे नाव : सावी.. एका संघर्षमय जीवनाची गाथा
लेखिका, कवयित्री : नसीम जमादार
प्रकाशक : संस्कृती प्रकाशन
प्रकाशन वर्षे :एप्रिल २०२५
एकूण पृष्ठसंख्या : ६४
वाड्मय प्रकार : बालकादंबरी

# कोरडेवाडी येथील अशोक यादव याच्याविरुद्ध बालविवाहाचा गुन्हा नोंद

केज । प्रतिनिधी

अडीच वर्षांपूर्वी अल्पवयीन मुलीसोबत बाल विवाह केल्या प्रकरणी कोरडेवाडी येथील अशोक बारीकराव यादव याच्या विरुद्ध केज पोलिस ठाण्यात बालविवाह आणि बाल लैंगिक अत्याचार कायद्याच्या कलमांनुसार मंगळवारी रात्री ११ वाजता गुन्हा नोंद झाला आहे. बीड तालुक्यातील पिंपळनेर येथील अल्पवयीन पीडित मुलीचा बालविवाह आई, वडील व नातेवाईकांनी नोव्हेंबर २०२३ मध्ये अशोक बारीकराव यादव रा.कोरडेवाडी याचे सोबत झाला होता.



दरम्यान पीडित अल्पवयीन मुलगी गरोदर राहिल्यानंतर रविवारी दि.१८ तिच्या पोटात दुखु लागल्यामुळे सासरच्या मंडळींनी तीला नेकनूर येथील शासकीय महिला रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले आसता, या महिलेची रुग्णालयात प्रसूती झाली व तीला मुलगा झाला. दरम्यान उपचार करणारे वैद्यकीय अधिकारी डॉ.मसुरे यांनी महिलेच्या नातेवाईकांकडे आधार कार्डची मागणी केल्या नंतर या पीडितेचा बालविवाह झाल्याचे डॉक्टरच्या निदर्शनास आले.त्यामुळे त्यांनी ही माहिती नेकनूर पोलिसांना कळविली. अडीच वर्षांपूर्वी हा बालविवाह केज तालुक्यातील कोरडेवाडी येथे झाल्यामुळे ही माहिती केज पोलिसांना देण्यात आली. त्या नुसार केज पोलिसात पीडित अल्पवयीन मुलीचा पती अशोक बारीकराव यादव रा.कोरडेवाडी याचे विरुद्ध बालविवाह आणि बाल लैंगिक अत्याचार कलमान्वये गुन्हा नोंद झाला आहे. पोलीस निरीक्षक वैभव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पिंक पथकाचे प्रमुख पोलीस उपनिरीक्षक प्रकाश शेळके हे पुढील तपास करीत आहेत.पीडित अल्पवयीन महिला व बाळ हे नेकनूर येथील रुग्णालयात सुखरूप असल्याची माहिती वैद्यकीय अधिकारी डॉ. मसुरे यांनी प्रतिनिधीशी बोलताना दिली.

# राजमाता अहिल्यादेवी होळकर यांची जयंती मोठ्या प्रमाणात साजरी करावी : प्रा अण्णासाहेब मतकर

बीड । प्रतिनिधी

पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांची जयंती ३१ मे रोजी संपूर्ण देशभरात मोठ्या प्रमाणात उत्साह साजरी करण्यात येत असते महाराष्ट्रात दरवर्षी ३१ मे रोजी गाव वाड्या वस्ती या ठिकाणी जयंती मोठ्या प्रमाणात साजरी करण्यात येते. दरवर्षीप्रमाणे यंदाही जयंती सर्वत्र साजरी करावी असे आव्हान राष्ट्रीय समाज पक्षाचे जिल्हाध्यक्ष प्राध्यापक अण्णासाहेब मतकर यांनी केले आहे.

तसेच राष्ट्र नायक महादेवजी जानकर साहेब यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे जन्मगाव चौंडी या ठिकाणी पहिली जयंती साजरी केली आणि समाजातील लोकांना अहिल्यादेवींचा इतिहास सांगण्यास सुरुवात केली पूर्ण महाराष्ट्रभर जागृती करून धनगर समाजाला न्याय देण्याचे काम जानकर साहेबांनी केले आणि त्याची दखल घेऊन



आज राज्य शासनाच्या वतीने चोंडी येथे जयंती साजरी होत आहे. त्यानंतर जानकर साहेबांनी देशातील सर्व लोकांना अहिल्यादेवींचा इतिहास माहीत व्हायला पाहिजे यासाठी दिल्ली या ठिकाणी गेल्या चार–पाच वर्षांपासून जयंती साजरी करत आहेत. यावर्षी चौंडी ते दिल्ली अशी रथयात्रा काढून देशातील सर्व नागरिकांना जागृत करून दिल्ली या ठिकाणी अनेक मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये जयंती साजरी होत आहे आणि एक दिवस देशाचे पंतप्रधान स्वत: या जयंतीची दखल घेऊन साजरी करतील असा जाणकार साहेबाचा माणूस आणि देशामध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्यांचा विचारांचा दखल घेऊन त्या पद्धतीने वागले तर सर्वसामान्य जनता नक्कीच सुखी होईल.

शासनाच्या वतीने अनेक जयंतीच्या शासकीय सुट्ट्या दिल्या गेल्या आहेत, औचित्य साधून समाजातील अनेक घटकांना जयंती उत्सव साजरी करण्यासाठी पुरेसा वेळ मिळतो ,महापुरुषांचे त्यांनी केलेल्या त्यागाचा व त्यांच्या विचाराचा आत्म सन्मान करतात दिनांक ३१ मे रोजी पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त महाराष्ट्रात शासकीय सुट्टी जाहीर करावी व देशभरातील सर्व शासकीय कार्यालयात गाववाडी वस्ती तांडा या ठिकाणी राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती ३१ मे रोजी मोठ्या प्रमाणात जल्लोष साजरी करण्यात यावी असे आव्हान सुद्धा राष्ट्रीय समाज पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष प्राध्यापक अण्णासाहेब मतकर यांनी केले आहे.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची ३०० व्या जयंतीनिमित्त १० वी, १२ वी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व व्याख्यानाचे आयोजन

## मोठ्या संखेने सहभागी व्हावे : अशोक लोढा यांचे आवाहन

बीड । प्रतिनिधी

पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर (१७२५–१७९५) या होळकर घराण्याच्या राणी होत्या. त्या एक महान शासक, पराक्रमी योद्धा, धर्मप्रेमी आणि परोपकारी महिला म्हणून ओळखल्या जातात. त्या मालवा प्रदेश (मध्य प्रदेश) आणि होळकर राज्यावर राज्य करत होत्या. अहिल्याबाई होळकर यांचा जन्म ३१ मे १७२५ रोजी महाराष्ट्रातील चौंडी या गावी झाला, त्यांनी भारतभर अनेक मंदिरे आणि धर्मशाळा बांधल्या, ज्यात काशी विश्वनाथ मंदिराचा जीर्णोद्धार आणि दुरुस्ती यांचा समावेश आहे.त्यांनी सनातन धर्माची पायाभरणी तसेच प्रचार आणी प्रसार करण्याचे कार्य केले. त्यांनी न्याय व्यवस्था चांगली ठेवली, लोकांना न्याय दिला, आणि अन्याय दूर केला.



भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र प्रदेशने पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंती संपूर्ण राज्यभर थाटात साजरी करण्याचे सुचवले आहे. त्या अनुषंगाने बीड मध्ये राज्याच्या मंत्री ना. पंकजाताई मुंडे, माजी खा. डॉ. प्रीतमताई मुंडे, यांच्या मार्गदर्शनाखाली व भाजपा जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांच्या नेतृत्वात संपूर्ण जिल्हाभरात विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून, ही जयंती मोठ्या थाटात संपन्न होत आहे. बीड शहरामध्ये दिनांक २६ मे रोजी सकाळी ०९.०० वा. खंडोबा मंदिर स्वच्छता. व २७ मे रोजी १० वी १२ वी उतीर्ण ९०% पुढील अधिक गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व व्याख्यानाचे आयोजन सामाजिक न्यायभवन बीड येथे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख व प्रमुख पदाधिकारी यांच्या उपस्थितीत सायंकाळी ०४.०० वा. आयोजित केले आहे.

३१ मे रोजी सकाळी ०९.०० वा श्री क्षेत्र चौंडी येथे जाणाऱ्या मोटरसायकल रॅलीचे स्वागत अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्याजवळ करण्यात येणार असून, सायंकाळी बीड शहरामध्ये भव्य शोभा यात्रेचे आयोजन भारतीय जनता पार्टिच्या वतीने केले आहे. या सर्व कार्यक्रमास पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिकांनी मोठ्या संखेने उपस्थित राहावे अशी विनंती. शहर अध्यक्ष अशोक लोढा यांनी केले आहे. गुणवंत विद्यार्थी नाव नोंदणी साठी संपर्क – विकास ढोरमारे ७३८७२४०२५०, संतोष गवळी ९०४९७७७७४७, विलास बामणे ९२८४२८००४८

# पिंपळनेरचे भूमीपूत्र प्रदिपगुरूजी पिंपळनेरकर (रमाईसुत) यांना जीवनगौरव पुरस्कार जाहीर

बीड । प्रतिनिधी

पिंपळनेरचे भूमिपूत्र कवी तथा बालसाहित्यिक प्रदिपगुरूजी पिंपळनेरकर ( प्रदिप बाबुलाल पगारे) हे रमाईसुत या टोपन नावाने कविता , लेख व साहित्य लेखन करतात. त्यांच्या ३० वर्षातील शैक्षणिक व सामाजिक कार्याची दखल घेऊन त्यांना जीवनगौरव पुरस्काराने नाशिक येथे सन्मानित करण्यात येणार आहे.

छत्रपती संभाजीनगर येथील काळीज माझं साहित्य या साहित्य संस्थेच्या नाशिक येथे आयोजित करण्यात आलेल्या ८ जुन २०२५ रोजी राज्यस्तरीय काव्यसंमेलनात विविध जेष्ठ मान्यवरांच्या हस्ते कवी– प्रदिपगुरूजी पिंपळनेरकर यांना जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार असल्याचे नुकतेच संस्थेचे निवडपत्र प्राप्त झाले आहे. प्रदिपगुरुजी हे पेशाने शिक्षक असून नुकतेच त्यांच्या दोन्ही पायांवर मोठी शस्त्रक्रिया झालेली आहे. अंथरुणाला खिळवून असतांनाही त्यांनी या काळात यांच्या ५० व्या वाढदिवसानिमित्त दोन काव्यसंग्रह प्रकाशित करण्याचा मनोदय व्यक्त केला होता. त्यापैकी बालमित्रांची छान छान गाणी हा बालकाव्यसंग्रह प्रकाशनाच्या वाटेवर असून लाल पाणी मिळे रक्त या काव्यसंग्रहाच्या लेखनाचे काम प्रगतीपथावर आहे. तसेच या काळात त्यांनी ३०० पेक्षा जास्त कवितेची रचना करून १५०–२०० सन्मानपत्रे प्राप्त केली आहेत. तसेच विविध ऑनलाइन काव्यसंमेलनात सहभाग घेऊन विविध पारितोषीके प्राप्त केली आहेत. त्यांच्या या कार्याबद्दल आजारपणाच्या काळात यांना ४–५ पुरस्कारांनी देखील गौरवण्यात आलेले आहे.



आजारपणात त्यांचा १० प्रातिनिधिक काव्यसंग्रहात देखील कवितेचा सहभाग आहे. त्यात पाऊस, मधुगंध, क्रांतीज्योती, वारसा, येरे येरे ढगोबा( बालकाव्यसंग्रह), भीम जन्माची गाथा, रानफूल, वसंत ऋतू, आठवणीचा कोपरा व दर्पण या प्रातिनिधिक काव्यसंग्रहांचा समावेश आहे. विशेष बाब म्हणजे त्यांच्या बालमित्रांची छान छान गाणी या बालकाव्यसंग्रहाच्या १००० प्रती छत्रपती संभाजीनगर जिल्हातील प्रत्येक जिल्हा परिषद शाळेत मोफत भेट देण्यात येणार आहे. त्याकरिता त्यांनी मानवता बुक फाउंडेशन ची निर्मिती केली असून आपल्या प्रियजनांच्या नावे फक्त १००० प्रतींचा छपाई खर्च देणगी देऊन यांच्या स्मरणार्थ महाराष्ट्रातील कोणत्याही एका जिल्हासाठी १००० प्रती वाटाण्यात. यात पहिल्या पानावर त्यांच्या प्रियजनांचा फोटो व त्यांच्या स्मरणार्थ मोफत बालकाव्यसंग्रह वाटप. तर शेवटच्या पानावर ज्यांच्याकडून देणगी मूल्य प्राप्त झाले यांचा नामोल्लेख पुस्तकात असणार आहे.

या उपक्रमाची सुरुवात गुरुजींच्या मातोश्रींनी केलेली असून कै. बाबुलाल सखाराम पगारे पिंपळनेरकर यांच्या स्मरणार्थ छत्रपती संभाजीनगर जिल्हातील संपूर्ण जिल्हा परिषद शाळेसाठी श्रीमती रमादेवी बाबुलाल पगारे यांचेकडून देणगी मूल्य प्राप्त झालेले आहे. आपल्या राज्यातील इतर जिल्हांसाठी आपण ९८२३१३५९४ या संपर्क क्रमांकांवर संपर्क साधून सविस्तर माहिती घेऊ शकता.

प्रदिपगुरूजी यांना यापूर्वी जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगरचा आदर्थ शिक्षक पुरस्कार २०१४, लापन्स क्लब ऑफ औरंगाबादचा श्रेष्ठ गुरुजन पुरस्कार, विद्यार्थी सहायता संघ मुंबईचा साने गुरुजी आदर्श शिक्षक पुरस्कार, मनुष्यबळ विकास अकादमीचा अष्टक्षेत्री गौरव पुरस्कार, अनिस कार्यगौरव राज्य पुरस्कार, मानव प्रबोधन अकादमीचा राज्य पुरस्कार, तसेच पल्स पोलिओ मोहिमे अंतर्गत आंतरराष्ट्रीय पुरस्कार या विविध पुरस्कारांनी यापूर्वी यांचा सन्मान झालेला आहे. गुरुजींनी आतापर्यंत ४५ वेळा रक्तदान केलेले असून समाजाचा रुहभाग म्हणून १५–१७ लाखांपर्यन्त लोकवर्गणीतून विविध शाळांचा कायापालट केलेला आहे. यांच्या सामाजिक व शैक्षणिक कार्यास आमचा मानाचा मुजरा.

# देवगांव येथील रहिवाशी पांडूरंग मुंडे यांचे निधन

केज । प्रतिनिधी



केज तालुक्यातील देवगांव येथील रहिवाशी पांडूरंग साहेबराव मुंडे वय ४८ वर्षे याचे दि.२१ मे बुधवारी पहाटे बीड येथील सरकारी रुग्णालयात उपचारा दरम्यान निधन झाले. ते बऱ्याच दिवसांपासुन अल्पशा आजाराने त्रस्त होते. त्यांच्यावर बुधवारी सकाळी देवगांव येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. पांडूरंग मुंडे यांच्या पश्चात एक मुलगी जावाई,एक अविवाहीत मुलगा दोन बहीणी एक भाऊ असा परिवार आहे. पांडूरंग मुंडे यांच्या अकाली निधनाने देवगांव परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

# अनुसूचित जातीतील १० वी व १२ वी विज्ञान वर्गातील गुणवंत विद्यार्थ्यांचा भव्य सत्कार समारंभ

केज । प्रतिनिधी

'आझाद क्रांती सेना' व 'बहुजन जेष्ठ नागरिक मंच' केज च्या वतीने १०वी तसेच १२वी विज्ञान परीक्षा फेबुवारी मार्च २०२५ मध्ये ८० टक्के च्या वर मार्क घेऊन गुणवता यादीत विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झालेल्या अनुसूचित जातीतील विद्यार्थ्यांचा जुनच्या पहिल्या आठवड्यात केज येथे भव्य सत्कार समारंभ घेण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने १०वी तसेच १२वी विज्ञान परीक्षात ८० टक्केच्या वर मार्क घेऊन विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झालेल्या विध्यार्थ्यांचे वडील (पालक) वर्ग शिक्षक यांनी दिनांक ३० मे २०२५ पर्यंत आपल्या पाल्यांचे गुणपत्रक (मार्क्स मेमो) गुणवंत विध्यार्थी सत्कार संयोजन समिती, यांचेकडे व्हॉटअप द्वारे पाठवावेत असे आव्हान करण्यात येत आहे.



संयोजन समिती प्रा.रमेश पाटोळे सर केज ९०११९९३७०० प्रा.विक्रम गालफाडे सर केज ९०९६९२८६३०, मा.रमेश ढगे सर माजलगाव ९९२११३५५३६, भिवा जी जोगदंड बीड ९७६६५३७९४२, गालफाडे सचिन केज ९६८९९३७११५, बळीराम जी मस्के धारूर ९६९९७५८७९२, गुणवंत विद्यार्थी सत्कार संयोजन समिती, 'आझाद क्रांती सेना' व 'बहुजन जेष्ठ नागरिक मंच' केज यांच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा हा सत्कार समारंभ आयोजित करण्यात येणार आहे तरी विद्यार्थी, पालक व शिक्षक यांनी यामध्ये मोठा सहभाग नोंदवावा असे आवाहन केज येथील सामाजिक कार्यकर्ते बाबुरावजी गालफाडे सर यांनी केले आहे.

# वाणिज्य व विज्ञान शाखेकडे विद्यार्थ्यांचा कल

अंबाजोगाई । प्रतिनिधी

आपले करिअर घडविण्यासाठी विद्यार्थ्यांचा कल वाणिज्य व विज्ञान शाखेकडे आहे. तर कला शाखेला विद्यार्थ्यांची पसंती क्रमांत तीन आहे. शालांत परिक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. विद्यार्थ्यांचा ओढा कला शाखेकडे असतो. ही शाखा विद्यार्थ्यांच्या दृष्टीने अत्यंत सोपी मानली जाते. मात्र नौकरी आणि करिअर यासाठी निवड करताना विद्यार्थी आपले पसंती वाणिज्य व विज्ञान शाखेला देतो. आजची परिस्थिती ही याच धर्तीवर आहे. शालांत परिषदेचा निकाल लागल्यानंतर चांगले महाविद्यालय शोधण्याबरोबरच आपल्या करिअरला गती देणारी शाखा निवडण्यावर विद्यार्थ्यांचा कल असून आमच्या दृष्टीने वाणिज्य व विज्ञान या दोन शाखा महत्वाच्या आहेत. ते कला शाखेला आमचा प्रतिसाद क्रमांक तिन वरचा आहे.

वास्तविक पाहता विद्यार्थ्यांना विज्ञान व वाणिज्य शाखा अभ्यासाच्या दृष्टीने अवघड असल्याने कला शाखेकडे या विद्यार्थ्यांचा अधिक ओढा असायचा आजपर्यंतचे हे चित्र होते. परंतु नौकरी आणि करिअर या दोन्ही गोष्टींना विद्यार्थी महत्व देतो परिणामत: वाणिज्य व विज्ञान शाखेमुळे विविध कोर्स करता येतात. साधारणत: बँक व अन्य चांगल्या ठिकाणी नौकरी करण्यासाठी वाणिज्य व विज्ञान शाखा ही महत्वाची मानली जाते. दोन्ही शाखांचा अभ्यास अवघड असला तरी शिकवणी लावून त्याची तयारी विद्यार्थी वर्ग करतो.आजही हेच चित्र प्रवेशाच्या बाबतीत दिसून येत आहे. चांगल्या महाविद्यालयामध्ये प्रवेश घेताना प्राधान्य विज्ञान व वाणिज्य शाखांना दिले जाते व त्यावर विद्यार्थी अधिक भर देतात या दोन्ही शाखा आमच्या दृष्टीने आमचे करिअर घडविण्यासाठी महत्वाच्या आहेत व त्यामुळेच आमचा भर या शाखांवर असल्याचे विद्यार्थ्यांनी सांगितले.

# मंडळ अधिकारी सौ. शितल चाटे–सानप यांचा सत्कार सोहळा संपन्न

बीड । प्रतिनिधी

राजमाता–राष्ट्रमाता जिजाऊ प्रबोधन मंडळ, बीड व ज्येष्ठ नागरिक संघ, मित्रनगर यांच्या संयुक्त विद्यमाने कर्तव्यदक्ष व प्रामाणिक मंडळ अधिकारी सौ. शितल चाटे–सानप यांचा सन्मान थाटात पार पडला. श्री. हरिचंद्र चव्हाण (दादा), सेवानिवृत्त डेप्युटी इंजिनिअर मधुकर मस्के, रमेश बुरंगे यांच्या हस्ते सौ. चाटे–सानप यांचा शाल, पुष्पगुच्छ आणि सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.



कार्यक्रमाच्या प्रारंभी दादासाहेब सादोळकर यांनी सत्कारामागील भूमिका उलगडून सांगितली. उत्तर देताना सौ. शितल चाटे–सानप यांनी आपल्या कार्यप्रवासाची प्रेरणादायी झलक उपस्थितांसमोर मांडली. वडिलांनी लावलेल्या अभ्यासाच्या गोडीमुळे प्रथम तलाठी पदावर अमरावती येथे सेवा करण्याची संधी लाभली, अशी आठवण त्यांनी सांगितली. अवैध धंदे व बाळू उपसा यावर कडक कारवाई करताना शेतकरी हा केंद्रबिंदू ठेवून काम केले. प्रलोभनांना बळी न पडता प्रामाणिकपणे पार पाडलेल्या कामामुळेच आज मुंबई, पुणे, संभाजीनगर, बीड, दिल्ली, गुजरात अशा विविध ठिकाणी त्यांचा सन्मान झाल्याचे त्यांनी सांगितले. महिला असूनही ३४ गावांचा कार्यभार समर्थपणे सांभाळत आहेत. अखंड शेतकऱ्यांच्या व जनतेच्या हितासाठी प्रामाणिक सेवा देत राहीन, असा आत्मविश्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच वरिष्ठ अधिकारी शेळके साहेबांसारखे मार्गदर्शक लाभल्यामुळे अधिक जोमाने काम करता येते, असे त्यांनी आवर्जून नमूद केले. या गौरव सोहळ्याला निवृत्त तहसीलदार कांतीलाल सानप, राजेंद्र कुलकर्णी, बी. आर. कराउ, दीपक जोशी, बी. एम. बांगर, ए. के. वाघ, धोंडीबा सावंत, फुलचंद ढाकणे, शेळके यांच्यासह सौ. शितल यांच्या आई इंदुमती आणि वडील लक्ष्मण चाटे यांची उपस्थिती लाभली होती.

# आंतरराष्ट्रीय जैवविविधता दिन

## सर्वप्रथम आपणा सर्वांना आंतरराष्ट्रीय जैवविविधता दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

प्रत्येकवर्षी २२ मे रोजी जगभरात आंतरराष्ट्रीय जैवविविधता दिन साजरा केला जातो. या दिनाचे उद्दिष्ट म्हणजे पृथ्वीवरील विविध सजीवांच्या प्रकारांचे संरक्षण करणे आणि त्यांच्या अस्तित्वाची जाणीव सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवणे. जैवविविधता म्हणजे फक्त प्राणी–पक्षी नव्हे, तर झाडे, गवत, कीटक, सूक्ष्मजीव, समुद्रातील जीव, आणि अगदी माणसांचाही समावेश यामध्ये होतो. हे सगळे मिळूनच पर्यावरणाचा समतोल राखतात. आपण जे अन्न खातो, जे औषध वापरतो, आपले आरोग्य आणि अर्थव्यवस्था हे सर्व जैवविविधतेवरच अवलंबून आहे. परंतु आज प्रदूषण, जंगलतोड, हवामान बदल, आणि मानवी हस्तक्षेपामुळे अनेक प्रजाती नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. आपण निसर्गाचे रक्षण केले नाही, तर



भविष्यात आपल्यालाच त्याचे गंभीर परिणाम भोगावे लागतील असे पर्यावरण मित्र तथा जलप्रेमी बाजीराव ढाकणे यांनी म्हटले आहे. म्हणूनच जैवविविधतेचे संवर्धन, संरक्षण आणि शाश्वत उपयोग ही काळाची गरज आहे. शाळा, कॉलेज, संस्था आणि सर्वसामान्य नागरिकांनी एकत्र येऊन वृक्षारोपण, जनजागृती, आणि नैसर्गिक संसाधनांचा जबाबदारीने वापर करणे आवश्यक आहे. परंतु आज प्रदूषण, जंगलतोड, हवामान बदल, आणि मानवी हस्तक्षेपामुळे अनेक प्रजाती नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. आपण निसर्गाचे रक्षण केले नाही, तर भविष्यात आपल्यालाच त्याचे गंभीर परिणाम भोगावे लागतील असे पर्यावरण मित्र तथा जलप्रेमी बाजीराव ढाकणे यांनी म्हटले आहे.

आजच्या या विशेष दिवशी आपण सर्वांनी एक संकल्प करू या – की आपल्याला जैवविविधतेचे रक्षण करायचे आहे, निसर्गाशी जुळवून घ्यायचे आहे आणि पुढच्या पिढ्यांसाठी एक समृद्ध आणि संतुलित पर्यावरण अबाधित ठेवायचे आहे. असे मत पर्यावरण मित्र तथा जलप्रेमी बाजीराव ढाकणे यांनी व्यक्त केले आहे.

# जातेगांव प्राथमिक आरोग्य केंद्राचा अजब कारभार, सी.एच. ओ.बनले मेडिकल ऑफिसर

## डॉ.मिसबाह सय्यद सतत राहतात गैरहजर, नागरिकांचे आरोग्य धोक्यात

सिरसदेवी । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील जातेगांव प्राथमिक आरोग्य केंद्रात दोन वैद्यकीय अधिकारी देण्यात आले आहेत. परंतु त्यातील एक तलवाडा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात काम करतात परंतु डॉ. मिसबाह सय्यद या जातेगांव प्राथमिक आरोग्य केंद्रात सतत गैरहजर राहत असल्याने असल्याने रुग्णांची प्रचंड गैरसोय होत आहे.




जातेगांव प्राथमिक आरोग्य केंद्रात डॉ. मिसबाह सय्यद या वारंवार गैरहजर राहत असल्याने ओपीडी मध्ये सी. एच.ओ. म्हणजे समुदाय आरोग्य अधिकारी हे रुग्णांची तपासणी करत असल्याचा धक्कादायक प्रकार जातेगांव प्राथमिक आरोग्य केंद्रात समोर आला. विशेष म्हणजे कुठल्याही समुदाय आरोग्य अधिकारी यांना प्राथमिक आरोग्य केंद्रात ड्युटी करण्याचे आदेश नसताना तसेच इ.ड.उ.नर्सिंग किंवा इ.–.च.ड.शिक्षण असलेले उपकेंद्राचे कंत्राटी कर्मचारी हे प्रा. आ. केंद्रात स्वतः ला मेडिकल ऑफिसर भासवून रुग्णांची तपासनी करू शकत नाहित असे असताना समुदाय आरोग्य अधिकारी जातेगांव प्राथमिक आरोग्य केंद्रात तपासणी कसे करत आहेत? डॉ.सय्यद यांना सतत गैरहजर राहता यावे म्हणून या समुदाय आरोग्य अधिकारी यांना रुग्णांची तपासणी करण्याचे अधिकार डॉ.सय्यद देतात का?असा प्रश्न उपस्थित होत आहे. समुदाय आरोग्य अधिकारी यांना उपकेंद्रात ड्युटी करण्याचे अधिकार आहेत परंतु डॉ. सय्यद या आपल्या अधीकाराचा गैरवापर करून या समुदाय आरोग्य अधीकार्यांना प्राथमिक आरोग्य केंद्रात रुग्णांची तपासणी करण्यास पाठवतात यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात येऊ शकते असे असताना डॉ सय्यद सतत गैरहजर राहतात कश्या असा प्रश्न उपस्थित होत आहे. या गंभीर परिस्थितीमुळे प्राथमिक आरोग्य केंद्रात येणाऱ्या रुग्णांची अक्षरशः हेळसांड सुरू असून उपचार वेळेवर मिळत नसल्याने नागरिकांत तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

शासनाने ग्रामीण भागातील गरीब रुग्णांना त्वरित व दर्जेदार आरोग्य सुविधा मिळाव्यात, यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्रांची स्थापना केली आहे. तसेच हेल्पलाइन नंबर १०४ हा जाहीर केलेला आहे. बऱ्याच नागरिकांना हा नंबर माहिती नाही या नंबर वर तुम्ही तक्रार करू शकता. कुठल्याही प्राथमिक आरोग्य केंद्रात किंवा उपकेंद्रात किंवा शासकीय रुग्णालयात डॉक्टर गैरहजर असेल तर यांची तक्रार तुम्ही देऊ शकता. शासन जनतेच्या आरोग्यसाठी लाखो रुपये खर्च करते.

मात्र,जातेगांव प्राथमिक आरोग्य केंद्राचा अनुभव पाहता शासनाचा हा खर्च व्यर्थ जात असल्याचे चित्र दिसून येत आहे. जातेगांव प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैध्यकीय अधिकारी डॉ सय्यद या प्रा. आ. केंद्रात हजर राहत नसल्याचा आरोप रुग्ण व ग्रामस्थ करत आहेत.आरोग्य केंद्रातील जबाबदाऱ्या दुर्लक्षित ठेऊन सरकारी वेतन घेणाऱ्या डॉ. सय्यद कारवाई करून जातेगांव प्राथमिक आरोग्य केंद्रातून हकालपट्टी करावी अशी मागणी परिसरातील नागरिकांमधून होत आहे.

दरम्यान, जातेगांव येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी हे मुख्यालयाला हजर राहत नाही.आरोग्य केंद्राचा कारभार हा समुदाय आरोग्य अधिकारी यांच्या रामभरोसेच चालत असल्याचा प्रकार उघडकीस आला असून या मुजोर वैध्यकीय अधिकारी यांच्यावर कारवाई करणे गरजेचे आहे, अशी मागणी जातेगांव येथील सुज्ञ नागरिकांकडून होत आहे. याबाबत तालुका वैद्यकीय अधिकारी, जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी या बाबीकडे लक्ष देऊन डॉ.मिसबाह सय्यद यांच्यावर कारवाई करणे गरजेचे आहे.तसेच डॉ.सय्यद या आठवड्यातुन जातेगांव प्राथमिक केंद्रात एकदाच येतात या आठवड्यात सोमवार, मंगळवार, बुधवार, शुक्रवार या रोजी गैरहजर आहेत यामुळे डॉ.सय्यद एकदाच आरोग्य केंद्रावर येतात हे दिसून येत आहे. यामुळे जिल्हा शल्यचिकिसक, जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी डॉ. सय्यद यांची हकालपट्टी करून त्यांच्यावर कारवाई करावी अशी मागणी जातेगांव येथील रुग्णांकडून, नागरिकांमधून होत आहे.



# साहेब, रूई पिंपळा खडकी देवळा पाकिस्तानात आहे का?

## खडकी ते सोन्ना फाटा रस्ता बनला मृत्यूचा सापळा नागरिकांची तारेवरची कसरत थांबणार कधी ? रस्त्यात शेकडो मोठेमोठे खड्डे अपघाताला आमंत्रण !

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील खलबिड जिल्हा परिषद सर्कल मध्ये असणारा, खडकी ते सोना फाटा रस्ता हा खूप खराब रस्ता झालेला आहे. मृत्यूचा सांभा बनलेला आहे. दिवशी दिवस या रस्त्यावर अपघात होत आहेत. देवळा खडकी लगत असणाऱ्या वाड्या वास्त्या तांडे, यांना वडवणी तालुक्याकडे दळणवळणासाठी मुख्य रस्ता हाच आहे. मात्र या रस्त्यामुळे दहा ते पंधरा किलोमीटर जास्त, करत खडकी देवळात घाटसावळी त्या रस्त्याने वडवणी करत तालुक्याच्या ठिकाणी नागरिकांना यावं लागतं, याच रस्त्या पायी हे आहे दुर्दैव. लोकप्रतिनिधी व स्थानिक प्रशासन झोपले की झोपेचं सोंग घेतल काय असा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांना आहे ? शेतकऱ्यांनी जागोजागी रस्ता खांदेलेला आहे.

याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष आहे त्यामुळेच हा रस्ता खूप खराब झालेला आहे. त्यामुळे दळणवळणाची होणारी गैरसोय नाकारता येत नाही. म्हणूनच चिखल बीड जिल्हा परिषद मधील काही गाव, हे पाकिस्तान मध्ये आहेत का यांना रस्त्याची आवश्यकता नाही का ? यांच्या दळणवळणाचा खूप मोठा प्रश्न गंभीर बनला आहे. जवळपास २०१६ मध्ये हा रस्त्याचे काम झालं होतं. त्यानंतर मला आठ वर्षे होते तरीही या रस्त्याकडे स्थानिक प्रशासन किंवा लोकप्रतिनिधी लक्ष देत नाही. आणि असेच रस्ते वाढवणे तालुक्यात संपूर्ण गावातील बनलेले आहेत. हा रस्ता तात्काळ व्हावा असे निवेदन देखील सामाजिक कार्यकर्त्यांनी अनेक वेळा दिले होते मात्र त्याचा काही एक उपयोग झाला नाही. हा रस्ता पाटबंधारे विभाग किंवा जिल्हा परिषद मार्फत तात्काळ व्हावा, अशी मागणी सर्वसामान्य नागरिक करत आहेत.

# चौसाळा परिसरात चोरटयांचा हैदोस चोरट्यांनी पालशिंगण शिवारात

## पवनचक्की कंपनीच्या अॅल्युमिनियम तारेवर दरोडा टाकला

चौसाळा । प्रतिनिधी

नेकनुर पोलिस स्टेशन हद्दीतील चौसाळा परिसरात चोरटयानी धुमाकुळ घातला असुन दोनच दिवसापुर्वी चौसाळा बायपास वरती दुचाकी आडवी लावून सामाजिक कार्यकर्ते विवेक कुचेकर याना पैसाची मागणी करण्यात आली होती पण अचानकपणे पाठीमागुन येणारया स्वीफट डिजायर गाडीने ब्रेक मारताच हे चोरटे पसार झाले होते तर चौसाळा येथिल घारगाव रस्तयावरील पांडुरंग कळासे यांच्या दहा शेळया चोरीला गेल्या होत्या ही घटना ताजी असतानाच अनेक शेतकऱ्यांना पोलीस संरक्षणात मावेजा न देता गंडा घालणाऱ्या पवनचक्की कंपनीलाच चोरट्यांनी चुना लावला आहे.

नेकनूर ठाणे हद्दीतील चौसाळा परिसरातील पालसिंगण शिवारात चोरट्यांनी ग्रीन पॉवर कंपनीच्या तीन टॉवरवरील क्रास आर्म कट करुन तब्बल २ हजार १३२ फुट अॅल्युमिनियम तारेची चोरी केली. या तारेची किमंत २ लाख ५० हजार रुपये इतकी आहे. याप्रकरणी नेकनूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पवनचक्की कंपनीने तार ओढताना अनेक शेतकऱ्यांना मावेजा न देता गंडा घालण्याचा काम केलं. त्याच ओटू कंपनीच्या तीन टावर वरील २ हजार फुटाहून अधिकची

### चौसाळा बायपासवरती वाटमारीचे प्रकार वाढले

तार चोरट्यांनी लंपास केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी कंपनीचे प्रशांत माने (रा.बीड) यांनी याबाबत फिर्याद नोंदविली. त्यानुसार, ते ग्रीन पॉवर एक्सआय (ओटू पॉवर) येथे कार्यरत आहेत.दि. ११ मे रोजी सायंकाळी ते चौसाळा ते पालसिंगण या परिसरात पेट्रोलिंग करत होते. या दरम्यान पालसिंगण शिवारातील टॉवर क्र.३८,३९ व ४० क्रमाकांच्या टावरवरील २ हजार ३२ फुट अॅल्युमिनियम कंडक्टर तार चोरी झाल्याचे निदर्शनास आले. या प्रकरणी नेकनूर पोलीस ठाण्यात अज्ञाताविरुध्द बुधवारी २१ मे रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. चौसाळा व परिसरात चोरयाचे प्रमाण वाढले असुन आठ दिवसापुर्वी देखील चौसाळा घारगाव रस्तयानजीक असलेल्या कळासे नामक शेतकरयाच्या दहा शेळया चोरटयानी चोरून केल्या आहेत.

याचा देखील तपास अधाप लागलेला नाही परिसरात दिवसेंदिवस चोरयाचे प्रमाण वाढल्यामुळे नागरिकामध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले असुन चौसाळा बायपासवरती तर सामान्य लोकांना वावरणे कठीण होवून बसले आहे याठिकाणी रात्रीची गस्त वाढविण्यात यावी व झालेल्या चोरीचा तपास तात्काळ लावण्यात यावा अशी मागणी सर्व सामान्य करताना पाहावयास मिळत आहे.

# ना.संजय सिरसट यांच्या नागरी सत्कारास हजारोच्या संख्येने उपस्थित राहावे–शेख फेरोज

माजलगाव । प्रतिनिधी

राज्याच्या सामाजिक न्याय मंत्रीपदी तथा छत्रपती संभाजी नगरच्या पालकमंत्री पदी निवड झाल्याबद्दल ना.संजय सिरसट यांच्या नागरी सत्काराचे आयोजन माजलगाव येथे दि.२४ शनिवार रोजी बहुजन समाजाच्या वतीने करण्यात आले आहे. या नागरी सत्कारास हजारोंच्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन बहुजन विकास मोर्चाचे अल्पसंख्यांक तालुकाध्यक्ष शेख यांनी केले आहे.

शहरातील जुना मोंढा येथे आयोजित करण्यात आलेल्या या नागरी सत्कार कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बहुजन नेते बाबुराव पोटभरे असणार आहेत.तर स्वागत अध्यक्ष उपसभापती श्रीहरी मोरे, सचिन डोंगरे हे भूषवणार आहेत. त्याचप्रमाणे कार्यक्रमात माजी मंत्री आ.धनंजय मुंडे, आ.प्रकाश सोळंके आ.सुरेश धस, आ. विजयसिंह पंडित, आ.नमिता मुंदडा, शिवसेनेच्या युवा नेत्या हर्षदा सिरसट यांची उपस्थिती असणार आहे.दुपारी चार वाजता गायनाचा कार्यक्रम पेढे तुला व नागरी सत्कार असा भव्य दिव्य कार्यक्रम होणार आहे. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संयोजन समिती नवनाथ धायजे, राजेश साळवे, भीमराव टाकणखार, प्रशांत ससाने, सदानंद प्रधान, मुरलीधर साळवे, सचिन जावळे, विठ्ठल पंडित, राहुल मस्के,अशोक लांडगे, प्रदीप पट्टेकर, वसंत वाव्हळकर, बाबा शेख, विजय धाईजे, विनोद शिंदे, अभिजीत पोटभरे, अक्षय मोरे, सदानंद प्रधान, बाबा वाघमारे, नितिन काळे, किरण खळगे, विजय साळवे, धर्मा मोरे, आकाश माने, दीपक टाकणखार, जयदीप तांगडे, विठ्ठल पंडित, लखन हजारे इत्यादी बहुजन विकास मोर्चाची सर्व टीम काम करीत असून या कार्यक्रमास हजारच्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन बहुजन विकास मोर्चचे अल्पसंख्यांक तालुकाध्यक्ष शेख फिरोज यांनी केले आहे.

# सिरसाळ्याचे सरपंच सुप्रीम कोर्टात अखेर अपात्र

सिरसाळा । प्रतिनिधी

सिरसाळा ग्रा.चे सरपंच सय्यद अन्वर यांना (वयाच्या) पुराव्या आधारे उच्च न्यायालयाने अपात्र केल्यानंतर त्यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती सर्वोच्च न्यायालयात ७ मे ला सुनावणी झाली तद्नंतर १४ मे ला सुनावणी झाली मा. न्यायालयाने २१ मे रोजी फायनल सुनावणी ठेवली होती ती आज रोजी निकाली काढण्यात आली आनि सिरसाळा सरपंच अपात्र ठरवण्यात आले.



सिरसाळ्याच्या सरपंचाच्या (वयाच्या) मुद्द्यावरून सिरसाळा ग्रामपंचायत चे सरपंच सय्यद अन्वर यांचे सरपंच पद मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजी नगर खंडपीठाने देखील अपात्र ठरवले होते. तसा निकाल नुकताच न्यायालयाने दिला आहे. या अगोदर जिल्हा अधिकारी विभागीय आयुक्त यांच्या न्यायदालनात सिरसाळा ग्रामपंचायत चे सय्यद अन्वर यांचे सरपंच पद अपात्र ठरविण्यात आले होते. याला आव्हान देत सरपंच सय्यद अन्वर यांनी पुढचे दार ठोठावले होते. परंतु अगोदरचा निकाल पाहून उच्च न्यायालयाने कायम ठेवत आपण त्याबाबत कायम ठेवत अपत्रेबाबत निकाल दिला आहे. पण या वेळी मा.उच्च न्यायालयाने २१ मे रोजी फायनल सुनावणी ठेवली होती. ती आज रोजी निकाली काढण्यात आली आणि (वयाच्या) पुराव्यासह सिरसाळा सरपंच अपात्र ठरवण्यात आले आहे. सर्व सिरसाळा परिसरात सामान्य नागरिकांमध्ये या निकालाचे स्वागत व पेढे भरून फटाके फोडून आनंद उत्सव साजरा करीत आहेत.

या पुढिल काम सिरसाळयाचे भूमीपुत्र ऑ.सतीष काळे व ऑ.कवडे साहेब यांनी व त्याची पूर्ण स्टीमने काम पाहिले आहे. प्रतिवादी तर्फे सिनीअर ॲड.सुधांशु चौधरी, ॲड.मकरंद आडकर ॲड.रामराजे कवडे, ड.सतिश काळे यांनी काम पाहिले.

# दीड महिन्यापासून न दिलेली माहिती आठ दिवसात गटशिक्षणाधिकारी देणार का?

धारूर । प्रतिनिधी

धारूर येथील गटशिक्षणाधिकारी कार्यालय हे सतत चर्चेत असते त्यात रोहित मुकुंद फावडे यांनी गेल्या दीड महिन्या पूर्वी ग.शि.अ. कार्यालय धारूर अंतर्गत कार्यरत केंद्रप्रमुखांच्या नियुक्ती बाबतची माहिती मिळवण्यासाठी दि.२७ मार्च २०२५ ला रीतसर अर्ज करून सुद्धा मागच्या दीड महिन्यापासून माहिती गटशिक्षणाधिकारी हे देत नसून अखेर दि.०५ मे रोजी प्रथम अपील साठी पंचायत समिती धारूर यांना माहिती च्या मागणीसाठी रीतसर अर्ज देण्यात आला होता परंतु त्यांनी आजपर्यंत ही माहिती देण्यात आलेली नाही.



त्यामुळे गट विकास अधिकारी पंचायत समिती धारूर यांच्याकडे रोहित फावडे यांनी प्रथम आपील केल्याने त्यांनी दि.२१ मे रोजी प्रथम सुनावणी पंचायत समिती धारूर येथे ठेवण्यात आली होती परंतु या सुनावणीसाठी माहितीचे प्रतिनिधी म्हणून आय इ साधन व्यक्ती श्री मदने डी एन हे उपस्थित होते व अपिलार्थी या सुनावणीच्या वेळी उपस्थित होते, यात कोणतीही माहिती दिलेली नाही त्या नंतर गटविकास अधिकारी पंचायत समिती धारूर यांनी गटशिक्षणाधिकारी धारूर यांना आठ दिवसात माहिती देण्यात यावी असे सुनावले आहे व माहिती न दिल्यास पुढील अपील करतील असे पत्र गटशिक्षण अधिकारी यांनी दिले आहे.

**माहिती अडवणारा तो मास्टरमाईंड कोण ?**

ग.शि.अ. कार्यालया अंतर्गत कार्यरत केंद्रप्रमुख यांना कोणत्या नियमा आधारे केंद्रप्रमुख म्हणुन पदोन्नती देण्यात आलेली आहे याबतची माहिती लेखी स्वरूपात देण्यात यावी अशी रीतसर अर्जाने मागणी केली होती. सध्या कार्यरत केंद्रप्रमुख यांना दिलेली नियुक्ती ही पात्र शिक्षकांना डावलून देण्यात आलेली आहे. नियुक्ती दिलेल्या सर्व केंद्रप्रमुखांनी जी काही कागदपत्रे केंद्रप्रमुख पदोन्नतीसाठी दिलेली आहेत त्या सर्व कागदपत्रांच्या सत्यप्रती देण्यात अशी रीतसर मागणी केली होती परंतु दिवसेंदिवस उलटूनही माहिती देण्यास टाळाटाळ होत आहे या प्रकारची माहिती गटशिक्षणाधिकारी यांची जबाबदारी असून त्यांचे पूर्ण;त दुर्लक्ष आहे. संबंधित अधिकाऱ्यावर दबाव टाकत माहिती नकात देऊ म्हणणारा तो मास्टरमाईंड कोण? याची चर्चा मात्र मोठ्या प्रमाणात होत आहे.

# परळी आगारात नव्या दहा लालपरी!

## अजय मुंडे यांच्या सह मान्यवरांच्या हस्ते नव्या बस प्रवाशांच्या सेवेत रुजू

परळी वैद्यनाथ । प्रतिनिधी

परळी वैद्यनाथ मतदारसंघाचे आमदार धनंजय मुंडे यांच्या माध्यमातून परळी हे बारा ज्योतिर्लिंगांपैकी पाचवे स्थान असल्याने येथील एसटी महामंडळाच्या आगारात नव्या दहा लाल परी बसेस उपलब्ध करून देण्यात आल्या असून या बसेसचे युवक नेते अजय मुंडे यांच्या सह मान्यवरांच्या हस्ते व महामंडळाच्या अधिकारी – कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत पूजन करून लोकार्पण करण्यात आले.

बारा ज्योतिर्लिंगांपैकी पाचवे स्थान असलेल्या परळी आगारात ये – जा करणाऱ्या प्रवाशांची संख्या अधिक असल्याने येथे नवीन २० बसेसची मागणी धनंजय मुंडे यांनी केली होती. त्यापैकी महामंडळाच्या वतीने सध्या दहा नवीन बसेस उपलब्ध करून दिल्या आहेत. या बसेसचे आज विधिवत पूजन करून लोकार्पण करण्यात आले, यावेळी अजय मुंडे यांच्या सह मान्यवर पदाधिकारी व नागरिकांनी नवीन बस मधून फेरफटका मारला.

यावेळी अजयजी मुंडे यांच्या सह राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष वैजनाथराव सोळंके, शहराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी, प्रा. विनोद जगतकर, बालाजी उर्फ पिंटू मुंडे, सुरेश टाक, के डी उपाडे, एजाज शेख, अनंत इंगळे, नितीन कुलकर्णी, शंकर कापसे, वसंत तिडके, संजय आघाव, सय्यद सिराज, दीपक तांदळे, रवी मुळे, अविनाश गवळी, सय्यद मुसा, रवी आघाव, महेंद्र रोडे, दत्ताभाऊ सावंत, गिरीश भोसले, गणेश सुरवसे, यांसह पदाधिकारी तसेच परळी आगाराचे अधिकारी – कर्मचारी उपस्थित होते.



हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड–४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१–७–३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड–४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक – दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT